RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १०, अंक ६७(३)] गुरुवार, ऑक्टोबर १०, २०२४/आश्विन १८, शके १९४६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १०६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.)**

**विशेष नियोजन प्राधिकरण**

ए ११०१- ११०९, शेल्टन सॅफायर, प्लॉट नंबर १८ व १९ सेशन कोर्ट जवळ, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**(सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, जावळी, सातारा व पाटण तालुक्यातील नवीन महाबळेश्वर गिरीस्थान अधिसूचित क्षेत्राकरिता)**

**सूचना**

क्रमांक मरारविम/विनिप्रा/नवीन महाबळेश्वर/२०२४/१७८९.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये, सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, जावळी, सातारा व पाटण तालुक्यातील नवीन महाबळेश्वर गिरीस्थान अधिसूचित क्षेत्राकरिता प्रारुप विकास योजनेचे प्रसिद्धिकरण....**

ज्या अर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे “उक्त अधिनियम” असे निर्देशिलेले) च्या कलम ४० चे पोट-कलम (१ब) मधील तरतुदीनुसार शासनास प्राप्त असलेल्या व इतर सर्व शक्तीस अनुसरून शासनाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१७/१६५२/प्र.क्र ३३५/१८/नवि-१३, दिनांक १३ सप्टेंबर २०१९ (शुद्धिपत्रक, दिनांक १५ नोव्हेंबर २०१९), व अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१७/१६५२/प्र.क्र ३३५/२०१८/नवि-१३, दिनांक ४ मे २०२३ (शुद्धिपत्रक, दिनांक १ ऑगस्ट २०२४) अन्वये (यापुढे “उक्त अधिसूचना” असे उल्लेखलेले) सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, जावळी, सातारा व पाटण तालुक्यातील नवीन महाबळेश्वर गिरीस्थान अधिसूचित क्षेत्रासाठी (यापुढे “उक्त अधिसूचित क्षेत्र ” असे उल्लेखलेले). महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची “विशेष नियोजन प्राधिकरण” (या पुढे “उक्त नियोजन प्राधिकरण” असे निर्देशिलेले) म्हणून नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम २१ (२) चे अनुषंगाने कलम २३ (१) मधील तरतुदीनुसार उक्त क्षेत्राची प्रारूप विकास योजना (या पुढे “उक्त प्रारूप विकास योजना ” असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा उक्त अधिसुचनांच्या अनुषंगाने **महाराष्ट्र शासन राजपत्र**,कोकण विभाग पुरवणी भाग-२, मध्ये दिनांक १ डिसेंबर-७ डिसेंबर २०२२ रोजी तसेच २० जून – २६ जून २०२४ रोजी प्रसिद्ध केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतूदीस अनुसरुन उक्त नियोजन प्राधिकरणाने, उक्त अधिसूचित क्षेत्राची उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी उक्त अधिसुचनांच्या अनुषंगाने उप मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची “नगररचना अधिकारी” म्हणून दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ व दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजीच्या आदेशानुसार नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार नगर रचना अधिकारी तथा उप मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी उक्त अधिनियमच्या कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर उक्त प्रारूप विकास योजना तयार करून ती उक्त नियोजन प्राधिकरणास सादर केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमच्या कलम २६(१) अन्वये प्रारूप विकास योजना नागरीकांकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यासाठी ठराव क्र.१४ दिनांक ३० सप्टेंबर २०२४ पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण, उक्त प्रारुप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६ (१) अन्वये नागरीकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजने संबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत :—

(१) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.), विशेष नियोजन प्राधिकरण, ए ११०१-११०९, शेल्टन सॅफायर, प्लॉट नंबर १८ व १९ सेशन कोर्ट जवळ, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, ४००६१४ व शिबिर कार्यालय, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.), विशेष नियोजन प्राधिकरण, नवीन महाबळेश्वर गिरीस्थान अधिसूचित क्षेत्र, मु.पो. नागठाणे, ता. जि. सातारा ४१५५१९.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अजिंक्य कॉलनी, पवई नाका, पिरवाडी, सातारा ४१५००१.

(३) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, २१२, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, पुणे ४११ ००१.

(४) सहाय्यक संचालक, नगररचना, शाखा सातारा, जिल्हा परिषद विस्तारित इमारत, पहिला मजला, रूम नं. २०-२४, सातारा ४१५००१.

(५) गट विकास अधिकारी, महाबळेश्वर/जावळी/सातारा/पाटण.

आपणामार्फत सदर सुचना संबंधित ग्रामपंचायतीच्या निदर्शनास आणावी.

(६) महामंडळाचे संकेत स्थळ *http://msrdc.in*

उक्त प्रारुप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरीकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत संचालक नगररचना (म.रा.र.वि.म.), विशेष नियोजन प्राधिकरण, ए ११०१-११०९, शेल्टन सफायर, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ अथवा विशेष नियोजन प्राधिकरण, नवीन महाबळेश्वर गिरीस्थान अधिसूचित क्षेत्र, मु.पो. नागठाणे, ता. जि. सातारा ४१५५१९ या कार्यालयास लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत, उक्त नियोजन प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या सूचना/ हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशीलाच्या प्रती योग्य शुल्क आकारुन उक्त नियोजन प्राधिकरणाच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० ते ४.०० या वेळेत नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

दिनांक ९ ऑक्टोबर २०२४.

**डॉ. अनिलकुमार ब. गायकवाड,**
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,
म.रा.र.वि.महामंडळ (मर्या.), मुंबई.

**MAHARASHTRA STATE ROAD DEVELOPMENT CORPORATION (LTD.)**

**SPECIAL PLANNING AUTHORITY (SPA)**

A 1101- 1109, Shelton Sapphire, Plot No. 18 & 19, Near Session Court, Sector 15, CBD Belapur, Navi Mumbai 400614

**(For New Mahabaleshwar Hill Station notified area in Mahabaleshwar, Jawali, Satara and Patan Talukas of Satara District)**

**Notice**

No. MSRDC/SPA/New Mahabaleshwar/2024/1789

**Publication of Proposed Draft Development Plan for New Mahabaleshwar Hill Station notified area in Mahabaleshwar, Jawali, Satara and Patan Talukas of Satara District**

**under Section 26(1) of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966.**

Whereas, the Government in pursuance of all other powers vested in it under the provisions of sub-section (*1B*) of section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS-1817/1652/CR-335/18/UD-13, dated 13th September 2019 (Corrigendum letter dated 15th November 2019) and Notification No. TPS-1817/1652/CR-335/2018/UD-13 dated 4th May 2023 (Corrigendum letter dated 1st August 2024) (hereinafter referred to as "the said Notifications") has appointed Maharashtra State Road Development Corporation as the Special Planning Authority (hereinafter referred to as "the said Planning Authority") for New Mahabaleshwar Hill Station notified area in Mahabaleshwar, Jawali, Satara and Patan Talukas of Satara District (hereinafter referred to as "the said notified area") ;

And whereas, the said Planning Authority in accordance with the provisions of Section 23 (1) and pursuant to Section 21 (2) of the said Act, notifications are published in the *Maharashtra Government Gazette*, Pune Division Supplemental Part-II, dated 1st December – 7th December 2022 and 20th June-26th June 2024 declaring its intension to prepare a Draft Development Plan (hereinafter referred to as "the said Draft Development Plan") for the said area ;

And whereas, as per the provisions of section 24 of the said Act, the said Planning Authority has appointed the Deputy Chief Planner as a " Town Planning Officer" *vide* order dated 21/02/2023 and 19/08/2024 for preparation of the draft development plan of the said notified area according to said notifications ;

And whereas, as per the provisions of the said Act the "Town Planning Officer" and Deputy Chief Planner, Maharashtra State Road Development Corporation, after preparing the existing land use map under section 25 of the said Act has prepared the said Draft Development Plan and submitted it to the Planning Authority ;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No.14 dated 30th September 2024 to publish the Draft Development Plan under Section 26(*1*) of the said Act for inviting suggestions/objections from the citizens.

Accordingly, the said Planning Authority is publishing the said Draft Development Plan, along with the Development Plan Report to invite suggestions/ objections from the citizens under Section 26 (*1*) of the said Act. The Maps and reports relating to the said Draft Development Plan are available for public inspection during office hours on working days at the office mentioned below :—

(1) The Director, Town Planning, Maharashtra State Road Development Corporation (Ltd), Special Planning Authority, A 1101- 1109, Shelton Sapphire, Plot No. 18 & 19, Near Session Court, Sector 15, CBD Belapur, Navi Mumbai, 400614 and Camp office, Maharashtra State Road Development Corporation (Ltd), Special Planning Authority, New Mahabaleshwar Notified Area, Post Nagathane, Taluka Satara, District Satara 415 519.

(2) Chief Executive Officer, Zilha Parishad, Ajinkya Colony, Powai Naka, Pirwadi, Satara 415 001.

(3) Joint Director, Town Planning, Pune Division, 212, 2nd Floor, New Administrative Building, In front of Vidhan Bhavan, Pune 411 001.

(4) Assistant Director of Town Planning, Branch office Satara, Extended building of Zilha Parishad, 1st Floor, Room No. 20/24, Satara 415 001.

(5) Block Development Officer, Mahabaleshwar/Jawali/Satara/Patan.

It is requested to please inform concern GramPanchayats regarding this Notice.

(6) Website of Corporation *http://msrdc.in*

If there are any suggestions/objections from the citizens regarding the provisions of the said Draft Development Plan, they shall be submitted in writing along with reasons within 30 days from the date of publication in the *Gazette* of the Government of Maharashtra. Any suggestions/objections shall be submitted to the office of Director of Town Planning (MSRDC), Special Planning Authority, A 1101-1109, Shelton Sapphire, CBD Belapur, Navi Mumbai 400614 or Maharashtra State Road Development Corporation (Ltd), Special Planning Authority, New Mahabaleshwar Notified Area, Post Nagathane, Taluka Satara, District Satara 415 519.

The suggestions/objections received by the said Planning Authority within 30 days from the date of publication of the said notification in the *Maharashtra Government Gazette* will be considered.

The Copies of the said "Draft Development Plan" along with the 'Draft Development Plan Report' shall be available for sale to the citizens at reasonable price in the office of the said Planning Authority on working days between 2.00 pm and 4.00 pm.

DR. ANILKUMAR B. GAIKWAD,
Vice Chancellor and Managing Director,
MSRDC Ltd., Mumbai.

Dated 9th October 2024.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.